MHRG030018232023

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०५/०९/२०२३ |
| नोंदणी तारीख | : | ०६/०९/२०२३ |
| निकाल तारीख | : | ०५/०५/२०२५ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस |
| | | ०१ ०८ ०० |

**<u>मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग यांच्या न्यायालयात</u>**

(पिठासिन अधिकारी श्रीमती एस्. डी. सोनी )

नियमीत फौजदारी खटला क्र. **१५९/२०२३**
सी.एन्.आर. क्र. MHRG03-0018232023
**निशाणी क्र. ५२/ब**

महाराष्ट्र सरकार तर्फे )
पोलीस स्टेशन अधिकारी ) ... अभियोग पक्ष
(पोयनाड पोलीस ठाणे) )
)

विरुद्ध

**रुपेश दशरथ पाटील** )
वय : ४० वर्षे, व्यवसाय : वाहनचालक व शेती )
राहणार : चिखली, पो. कुसुंबळे, ता. अलिबाग, ) ... आरोपी
जि. रायगड )
)

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील :– श्री. प्रसाद एस्. पाटील
आरोपीतर्फे वकील :– श्री. सचिन मकाणी

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. | साक्षीदारांचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | साक्षीदार क्र. १ पल्केश दशरथ पाटील | ११ | फिर्यादी |
| २. | साक्षीदार क्र. २ सुजेंद्र राजेंद्र पाटील | १४ | पंच साक्षीदार |
| ३. | साक्षीदार क्र. ३ दिनेश दशरथ म्हात्रे | १९ | पंच साक्षीदार |
| ४. | साक्षीदार क्र. ४ तेजश्री पल्केश पाटील | २२ | साक्षीदार |
| ५. | साक्षीदार क्र. ५ डॉ. श्रीमती प्रसन्ना बळीराम नाखवा | ३० | वैद्यकीय अधिकारी |
| ६. | साक्षीदार क्र. ६ डॉ. श्री. औदुंबर किसन कोळी | ३७ | वैद्यकीय अधिकारी |
| ७. | साक्षीदार क्र. ७ श्री. विजय किसनराव सरके | ४२ | तपासी अंमलदार |

## अभियोगपक्षामार्फत निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे विवरण |
|---|---|---|
| १. | साक्षीदार क्र. १ नि.क्र. १२, १३ | फिर्याद व छापील प्रथम खबर |
| २. | साक्षीदार क्र. २ नि.क्र. १५ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | साक्षीदार क्र. २ नि.क्र. १६ | टि-शर्ट जप्तीचा पंचनामा |
| ४. | साक्षीदार क्र. ५ नि.क्र. ३१ | पल्केश पाटील याचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ५. | साक्षीदार क्र. ६ नि.क्र. ३८ | पल्केश पाटील याचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ६. | साक्षीदार क्र. ७ नि.क्र. ४३ | मुद्देमाल पावती |
| ७. | साक्षीदार क्र. ७ नि.क्र. ४४ | सुरी जप्ती पंचनामा |
| ८. | साक्षीदार क्र. ७ नि.क्र. ४५ | मुद्देमाल पावती |
| ९. | साक्षीदार क्र. ७ नि.क्र. ४६ | आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१(१)(अ) अन्वये दिलेली नोटीस |

## बचावपक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे विवरण |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

<u>जप्त वस्तू</u>

| अ.क्र. | जप्त वस्तू व क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | सुरी | आर्टीकल 'अ' |
| २. | टि–शर्ट | आर्टीकल 'ब' |

<u>प्रथम खबरेचा तपशील व गुन्हा</u>

| | |
|---|---|
| प्रथम खबर दाखल दिनांक व वेळ | दि. ०५/०८/२०२३ रोजी ००.४९ वाजता |
| पोलीस ठाणे व गुन्हा क्रमांक | पोयनाड पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. १०२/२०२३ |
| गुन्हा व कायदा | भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ |

:: **<u>न्यायनिर्णय</u>** ::

(घोषित दि. ०५/०५/२०२५)

आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**<u>अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** :

२. फिर्यादी पल्केश दशरथ पाटील हा मूळ चिखली, पो. कुसुंबळे, ता. अलिबाग येथील राहणारा आहे आणि सध्या तो मुंबई येथे राहतो व बेस्ट, मुंबई येथे चालक म्हणून नोकरी करतो. त्याचे वडील दशरथ पांडुरंग पाटील हे कॅन्सर या आजाराने दि. २३/०७/२०२३ रोजी मयत झाले. फिर्यादी त्याच्या वडीलांचे मरणोत्तर अंत्यविधी करण्यासाठी मौजे चिखली येथे आला होता. आरोपी हा फिर्यादीचा सख्खा भाऊ आहे आणि त्यांचे घरगुती कारणांवरुन वादविवाद असून ते गेले दोन वर्षांपासून एकमेकांशी बोलत नाहीत. दि. ०३/०८/२०२३ रोजी दुपारी ०२.०० वाजताच्या सुमारास

फिर्यादीच्या वडीलांचे बारावे दिवसांचे कार्य असल्याने फिर्यादी आणि त्याचे चुलत काका सदानंद गंगाराम पाटील हे दुसऱ्या दिवशी अभिषेक करण्याबाबत चर्चा करीत असतांना आरोपी, 'मी सावत्र आहे का? मोठा भाऊ या नात्याने मला विचारता येत नाही का?' असे म्हणाला. त्यावेळी फिर्यादी आरोपीला, 'मोठा भाऊ म्हणून आईवडीलांना बघता येत नाही, वडील आजारी असतांना त्यांना दवाखान्यात कधी घेवून गेला होतास का? तब्बेत कशी आहे याबाबत कधी विचारणा केलीस का?' असे म्हणाला. त्यानंतर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ व दमदाटी केली. त्यावेळी घरातील उपस्थित असलेल्या नातेवाईकांनी त्यांचा वाद तेथे मिटविला. त्यानंतर काही वेळाने बायकांच्या ओरडण्याचा आवाज आला म्हणून फिर्यादी काय झाले बघण्यासाठी घरातून बाहेर गेला असता आरोपी त्याच्या हातात मोठी सुरी घेवू आला आणि त्या सुरीने त्याने फिर्यादीच्या डाव्या खांद्यावर मारुन दुखापत केली. त्यामुळे फिर्यादीच्या खांद्यातून रक्तस्त्राव होत होता. त्यावेळी फिर्यादीचे चुलत काका सदानंद पाटील व हरेश गायकर यांनी आरोपीला पकडून त्याच्या हातातील सुरी खेचून त्याला बाजूला नेले. त्यामुळे फिर्यादीने घटनेबाबत पोयनाड पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादवरुन गुन्हा क्र. १०२/२०२३ नोंदविण्यात आला. त्याचा तपास सहाय्यक फौजदार श्री. सरके यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळी जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, फिर्यादीचे टि-शर्ट जप्त करुन जप्ती पंचनामा केला आणि आरोपीने पोलीस ठाण्यात आणून दिलेली सुरी जप्त करुन त्यांनी जप्ती पंचनामा केला, घटनास्थळाचे आणि सुरी जप्त केल्याबाबत फोटो काढले, फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३२४,

५०४, ५०६ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यासाठी दोषारोप (निशाणी क्र. ८) निश्चित केला. त्यातील मजकूर त्यांनी आरोपीला वाचून दाखविला व समजावून सांगितला. आरोपीने जबाब (निशाणी क्र. ९) देवून गुन्हा नाकबुल असल्याचे सांगितले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब (निशाणी क्र. ४७) नोंदविण्यात आला. आरोपीचा बचाव नकारात्मक स्वरुपाचा आहे.

५. सहाय्यक सरकारी अभियोक्ता आणि आरोपीच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

६. न्यायालयाचे विचारार्थ निघालेले प्रश्न व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने फिर्यादीला सुरीसारख्या घातक हत्याराने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| २. | आरोपीने फिर्यादीला अपमानास्पद भाषेत शिवीगाळ करुन तो सार्वजनिक शांततेचा भंग करण्यास उद्युक्त होईल असे कृत्य केले, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| ३. | आरोपीने फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा केला, हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| ४. | आदेश कोणता ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## :: <u>का र ण मी मां सा</u> ::

७. आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने एकूण ७

साक्षीदार तपासलेले आहेत. त्यात फिर्यादी (अ.सा.१) (नि.क्र.११), पंच सुजेंद्र पाटील (अ.सा.२) (नि.क्र.१४), पंच दिनेश म्हात्रे (अ.सा.३) (नि.क्र.१९), तेजश्री पाटील (अ.सा.४) (नि.क्र.२२), डॉ. श्रीमती नाखवा (अ.सा.५) (नि.क्र.३०), डॉ. श्री. कोळी (अ.सा.६) (नि.क्र.३७) व तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) (नि.क्र.४२) यांची साक्ष नोंदविलेली आहे.

**प्रश्न क्र. १ ते ३ बाबत** :
(वरील प्रश्न एकमेकांशी संलग्न असल्याने त्यावरील निष्कर्ष मी एकत्रात देत आहे.)

८. फिर्यादी (अ.सा.१) याच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, त्याचे चिखली येथे वडीलोपार्जित घर आहे. दि. ०३/०८/२०२३ रोजी तो चिखली येथे त्याच्या वडीलांचे कार्य होते म्हणून गेला होता. तो त्याचे काका सदानंद पाटील याच्यासोबत भटजी किती वाजता येणार याबाबत चर्चा करीत होता. त्यावेळी आरोपीने 'मी सावत्र आहे का, मला विचारता येत नाही का?' असे म्हटले. म्हणून फिर्यादीने त्याला 'वडील कर्करोगाने रुग्णालयात भरती होते त्यावेळेस बघायला यायचे होते.' असे म्हटले. त्यानंतर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली, दमदाटी केली. सदर घटनेनंतर त्याच्या काकाच्या घरुन बायकांच्या ओरडण्याचा आवाज आला म्हणून फिर्यादी घराच्या बाहेर उंबरठ्यावर आला तेव्हा आरोपी त्याच्या हातात सुरा घेवून उभा होता आणि त्याने तो सुरा फिर्यादीच्या डाव्या खांद्यावर मारला, त्यामुळे तेथून रक्त येवू लागले. त्यानंतर फिर्यादीचे काका आणि चुलत भाऊ हरेश यांनी आरोपीला बाजूला केले व त्याच्या हातातून सुरा काढून घेतला. त्यामुळे फिर्यादीने घटनेबाबत फिर्याद (निशाणी क्र. १२) दिली. फिर्यादी (अ.सा.१) याने पुढे त्याला दाखवण्यात आलेला सुरा (आर्टीकल 'अ') आणि टि-शर्ट (आर्टीकल 'ब') तेच असल्याचे सांगितले आहे. फिर्यादी (अ.सा.१) याने उलटतपासात मान्य केलेले आहे की, त्याचे आणि आरोपीचे वाद असल्यामुळे ते

एकमेकांशी बोलत नाहीत.

९. तेजश्री पाटील (अ.सा.४) ही फिर्यादी (अ.सा.१) याची पत्नी आहे. तिच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, तिचे सासरे मयत झाल्यामुळे दि. ०३/०८/२०२३ रोजी उत्तरकार्य होते आणि दुसऱ्या दिवशी अभिषेक घालण्याबाबत फिर्यादी (अ.सा.१) आणि त्याचे काका यांच्यात चर्चा सुरु होती. पुढे तिच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, त्यावेळी आरोपी, 'मी मोठा भाऊ आहे, मी सावत्र आहे का?' असे म्हणाला. त्यावर फिर्यादी (अ.सा.१) हा आरोपीला, तू वडील आजारी असतांना त्यांना कधी विचारले नाहीस, हॉस्पीटलला कधी घेवून गेला नाहीस, असे म्हणाला. त्यावर आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व दमदाटी केली. सदरचा वाद नातेवाईकांनी तेथेच मिटविला होता. त्यानंतर आरोपी घरातील सुरी घेवून धावत आला आणि त्याने फिर्यादी मोकळ्या जागेत उभा असतांना त्याच्या डाव्या खांद्यावर सुरी मारली, त्यामुळे फिर्यादीच्या खांद्यातून रक्तस्त्राव होत होता. तिला दाखविण्यात आलेली सुरी (आर्टीकल 'अ') तिच असल्याचे तिने सांगितले आहे.

१०. सदर साक्षीदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी (अ.सा.१) आणि आरोपी यांचे पूर्वीपासून घरगुती कारणांवरुन वाद आहेत आणि ते एकमेकांशी बोलत नाहीत. तिने मान्य केले आहे की, आरडाओरडा ऐकू आल्यानंतर काय झाले ते पाहण्यासाठी ती गेली होती. पुढे तिने मान्य केले आहे की, ती ज्या वेळी घटनास्थळी पोहोचली त्या वेळेला फिर्यादी (अ.सा.१) याच्या खांद्याला दुखापत झालेली होती. सदर साक्षीदाराने दिलेल्या वरील कबुलीवरुन तिने घटना प्रत्यक्ष बघितली असावी याबाबत शंका निर्माण होते. कारण ती घटनास्थळी पोहोचली तेव्हा तिच्या पतीच्या खांद्याला दुखापत झालेली होती. याचा अर्थ सदर घटना घडल्यानंतर ती घटनास्थळी पोहोचली होती.

११. डॉ. श्रीमती नाखवा (अ.सा.५) आणि डॉ. कोळी (अ.सा.६) यांनी फिर्यादी (अ.सा.१) याची वैद्यकीय तपासणी केली होती. त्यांनी फिर्यादीच्या खांद्याला दुखापत झालेली असल्याचे सांगितले. त्यानुसार त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र. ३१ व ३८) दिलेले आहे. डॉ. श्रीमती नाखवा (अ.सा.५) यांनी सदर जखमा सुरी (आर्टीकल 'अ') ने होवू शकतात असे सांगितलेले आहे. सदर दोन्ही साक्षीदारांनी वैद्यकीय प्रमाणपत्र (निशाणी क्र. ३१ व ३८) सिद्ध केलेले आहेत.

१२. सुजेंद्र पाटील (अ.सा.२) हा घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. १५) आणि जप्ती पंचनामा (निशाणी क्र. १६) चा पंच आहे. त्याने त्याच्या पुराव्यात पोलीसांनी गंगाराम पाटील याच्या घरासमोर घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. १५) केल्याचे आणि एक टि–शर्ट (आर्टीकल 'ब') जप्त करुन जप्ती पंचनामा (निशाणी क्र. १६) केल्याचे सांगितलेले आहे. फिर्यादी हा या साक्षीदाराचा मेहुणा आहे. त्याने त्याच्या उलटतपासात पहिला पंचनामा झाल्यानंतर पोलीसांनी त्याला घरी जाण्यास सांगितले होते व तो घरी गेला होता असे सांगितले. त्यानंतर त्याने स्वतःहून दोन्ही पंचनामे एकाच वेळी केले होते असे सांगितले आहे.

१३. दिनेश म्हात्रे (अ.सा.३) हा सुरी जप्ती पंचनाम्यावरील पंच आहे. त्याने त्याच्या पुराव्यात सांगितले की, पोलीसांनी त्याला पोलीस ठाण्यात कोऱ्या कागदावर सही करायला लावले. सदर साक्षीदार अभियोग पक्षास पाठिंबा देत नाही. अभियोग पक्षाने सदर साक्षीदाराचा उलटतपास घेतला. परंतु त्याच्या उलटतपासात अभियोग पक्षास उपयोगी पडेल असे कोणतेही विधान मला आढळून आले नाही. म्हणून सदर साक्षीदाराचा पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त नाही.

१४. तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी गुन्हा क्र. १०२/२०२३

चा तपास केलेला आहे. तपासादरम्यान त्यांनी दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. १५) आणि फिर्यादीचे शर्ट जप्तीचा पंचनामा (निशाणी क्र. १६) केलेला आहे. सुजेंद्र पाटील (अ.सा.२) याच्या म्हणण्यानुसार टि–शर्ट जप्त करुन जप्ती पंचनामा (निशाणी क्र. १६) केलेला आहे. परंतु तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी फिर्यादीने घरातून शर्ट आणून दिला तो शर्ट जप्त करुन जप्ती पंचनामा केल्याचे सांगितले आहे. वरील पुराव्यातून फिर्यादीचा 'शर्ट' जप्त करण्यात आला की 'टि–शर्ट' जप्त करण्यात आलेला आहे ही बाब सुस्पष्ट होत नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा (निशाणी क्र. १६) हा संशयास्पद आहे .

१५. तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी आरोपीने गुन्ह्यात वापरलेली सुरी जप्त करुन जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ४४) केल्याचे सांगितले आहे. दिनेश म्हात्रे (अ.सा.३) हा सदर जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ४४) यावरील पंच आहे. परंतु तो फितुर आहे. तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी त्यांच्या पुराव्यात सदर सुरीचे वर्णन सांगितलेले नाही. जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ४४) यात सदरच्या सुरीचे वर्णन लांबी ९ इंच, मुठीची लांबी ०४.५ इंच, मुठीपासून पुढे ०४.५ लांबी असे नमूद केलेले आहे. परंतु तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी त्यांच्या पुराव्यात जप्त केलेल्या सुरीचे वर्णन सांगितलेले नाही. त्यामुळे सुरी जप्तीचा पंचनामा (निशाणी क्र. ४४) हा सिद्ध झालेला आहे असे म्हणता येणार नाही.

१६. सुजेंद्र पाटील (अ.सा.२) याने तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी त्याला चिखली येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते असे सांगितले आहे. तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी फिर्याद (निशाणी क्र.१२) चिखली गावातील दिलेली आहे ही बाब मान्य केलेली आहे. तसेच त्यांनी घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. १५) हा चिखली जलपाडा या गावात केलेला आहे ही बाब देखील मान्य केली आहे.

तसेच घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. १५) यात देखील घटनास्थळ पंचनामा चिखली जलपाडा येथे केल्याचे नमूद आहे. चिखली आणि चिखली जलपाडा ही दोन्ही गावे वेगवेगळी असल्याचे दिसून येते. फिर्यादी (अ.सा.१) याच्या म्हणण्यानुसार घटना चिखली येथे घडली. परंतु घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. १५) चिखली जलपाडा, तालुका अलिबाग येथे करण्यात आलेला आहे असे दिसून येते. त्यामुळे सदर घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. १५) हा जेथे प्रत्यक्षात घटना घडलेली आहे तेथे केलेला आहे किंवा नाही याबाबत संशय निर्माण होतो.

१७. फिर्यादी (अ.सा.१) याने फिर्याद (निशाणी क्र. १२) यात आरोपीने हातात मोठी सुरी आणली होती आणि त्या सुरीने त्याच्या डाव्या खांद्यावर मारुन दुखापत केली असे सांगितले आहे. परंतु फिर्यादी (अ.सा.१) याने त्याच्या पुराव्यात मात्र आरोपी त्याच्या हातात सुरा घेवून उभा होता आणि त्या सुऱ्याने त्याच्या खांद्यावर मारले असे सांगितले आहे. तपासी अंमलदार श्री. सरके (अ.सा.७) यांनी सुरा आणि सुरी हे दोन्ही वेगवेगळे हत्यार आहेत असे सांगितले आहे. सुरा हा सुरीपेक्षा मोठा असतो असे देखील त्यांनी सांगितलेले आहे. त्याचप्रमाणे त्यांनी फिर्यादी (अ.सा.१) याने फिर्याद देतांना त्याला सुऱ्याने मारहाण केली असे सांगितले नव्हते असे सांगितले आहे. जप्ती पंचनामा (निशाणी क्र. ४४) यावरुन एक प्लास्टीकची पांढऱ्या रंगाची मुठ असलेली घरगुती वापराची सुरी जप्त करण्यात आलेली आहे असे दिसून येते. परंतु फिर्यादी (अ.सा.१) याने आरोपीने सदर गुन्ह्यात सुरा वापरला असे त्याच्या पुराव्यात सांगितलेले आहे. त्यामुळे सदर गुन्ह्यात निश्चित कोणते हत्यार वापरण्यात आले आणि जे हत्यार वापरण्यात आले तेच हत्यार जप्त करण्यात आले ही बाब संशयास्पद वाटते.

१८. फिर्यादी (अ.सा.१) याच्या पुराव्याला पुष्टी देणारा इतर पुरावा न्यायालयीन अभिलेखात दाखल नाही. तेजश्री पाटील (अ.सा.४) ही फिर्यादीची पत्नी

आहे. परंतु ती घटनास्थळी पोहोचली त्यावेळी फिर्यादी (अ.सा.१) याच्या खांद्याला दुखापत झालेली होती. यावरुन तिने घटना प्रत्यक्ष बघितलेली नाही ही बाब स्पष्ट होते. फिर्यादी (अ.सा.१) आणि तेजश्री पाटील (अ.सा.४) यांच्या पुराव्यावरुन आरोपी आणि फिर्यादी यांच्यात बऱ्याच वर्षांपासून घरगुती कारणावरुन वाद आहेत आणि ते एकमेकांशी बोलत नाहीत असे दिसून येते. अशा परिस्थितीत फिर्यादी (अ.सा.१) याच्या पुराव्याला पुष्टी देणारा पुरावा न्यायालयीन अभिलेखात असणे आवश्यक आहे. परंतु फिर्यादी (अ.सा.१) याच्या पुराव्याला पुष्टी देणारा कोणताही सबळ पुरावा न्यायालयीन अभिलेखात दाखल नाही. एकंदरीत पुराव्यावरुन आरोपीने फिर्यादीला सुरीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली, शिवीगाळ केली आणि फौजदारीपात्र धाकदपटशा केला याबाबत संशय निर्माण होतो आणि त्या संशयाचा फायदा आरोपीला देणे क्रमप्राप्त ठरते. म्हणून मी प्रश्न क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न क्र. ४ बाबत</u>** :

१९. आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ नुसार शिक्षेस पात्र असणारा गुन्हा केला हे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरलेला आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. जप्त केलेली सुरी (आर्टीकल 'अ') व टि–शर्ट (आर्टीकल 'ब') अपील कालावधीनंतर नष्ट करणे योग्य होईल. त्यामुळे प्रश्न क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

:: **<u>आ दे श</u>** ::

१. आरोपी **रुपेश दशरथ पाटील** याला भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहीता कलम २४८(१) अन्वये दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. त्याला सोडून

देण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल सुरी (आर्टीकल ‘अ’) व टि–शर्ट (आर्टीकल ‘ब’) अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/– (रुपये पंधरा हजार मात्र) चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रक्कमेचा जामीन दिलेला आहे.

SUNITA DHANRAJ SONI
Digitally signed by SUNITA DHANRAJ SONI
Date: 2025.05.05 17:02:57 +0530

अलिबाग. ( **श्रीमती एस्. डी. सोनी** )

दिनांक : **०५/०५/२०२५.** मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.